आवृत्ती : १ अंक : ०४.

# वृत्तविद्या



दृष्टिक्षेपात: अग्रलेख- **‘ताप’मानवाढीचे वास्तव**
आयपीसीसी चा २०१८ चा जागतिक तापमानवाढीवरील अहवाल नुकताच प्रदर्शित झाला. या अहवालात पुढील काळात तापमानवाढ हि १.५ अंशांनी वाढणार असल्याचे संकेत दिले.

• पुणे, मंगळवार, १६ ऑक्टोबर २०१८. • सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्र विभाग येथून प्रकाशित. • आजचा अंक, पाने ०४.

**तापमान**

कमाल : ३१.४ डि. सें.
किमान : १८.६ डि. सें.

**हवामानाचा अंदाज :**
आकाश मुख्यत: निरभ्र राहण्याची शक्यता.

## उज्ज्वल निकम यांना महर्षी पुरस्कार जाहीर

**वृत्तविद्या प्रतिनिधी**

पुणे दि.१६ – यंदाचा मानाचा महर्षी पुरस्कार सरकारी वकील उज्ज्वल निकम यांना जाहीर झाला असून पुणे नवरात्र महोत्सवाकडून हा पुरस्कार दिला जातो.पुरस्काराचे वितरण उद्या सिने अभिनेता सयाजी शिंदे यांच्या हस्ते होणार गणेश कला क्रीडा मंच येथे होणार आहे. उज्ज्वल निकमांनी आजवर केलेल्या कामाबद्दल हा पुरस्कार देण्यात येत आहे असे मत–माजी उपमहापौर आबा बागुल यांनी व्यक्त केले.

## वाहतूक नियमांची 19 ऑक्टोबरपासून कडक अंमलबजावणी

पुणे, दि. १६ : वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी शहरात शंभर ठिकाणी तयार केलेले ‘नो ट्रॅफिक रुल व्हायलेशन झोन’ ११ ऑक्टोबरपासून कार्यान्वित होणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली. महापालिका, पुणे पोलीस आणि परिवहन विभागाच्या वतीने पोलीस आयुक्तालयात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. नागरिकांनी यापुढे वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन सौरभ राव यांनी केले .

## डॉ.मोहन आगाशेंना ‘विष्णुदास भावे गौरव पदक’

**वृत्तविद्या प्रतिनिधी**

पुणे दि. १५ : अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर सांगली समितीच्या वतीने देण्यात येणारे ‘विष्णुदास भावे गौरव पदक’ डॉ. मोहन आगाशे यांना जाहीर झाले आहे. या निमित्ताने महाराष्ट्र साहित्य परिषद, नाट्य परिषद आणि अखिल भारतीय चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. आगाशे यांचा ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात हा कार्यक्रम पार पडला.

# वेतनवाढीसाठी आंदोलन

### गेले १०४ दिवस वेतनवाढी साखळी उपोषण चालू आहे.

पुणे, दि. १६ : महाराष्ट्र राज्य सहकारी संघ सेवक कृती संघटनेचे साखळी उपोषण पुणे शासकीय मध्यवर्ती कार्यालयासमोर आज एकशेचार दिवस झाले तरी सुरूच आहे. सहकारी संस्थांनी संघाला शिक्षण निधी देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंगळवारी घेण्यात आला. परंतु कर्मचाऱ्यांचे सतरा महिन्यांचे वेतन थकीत आहे. त्याबाबत निर्णय न झाल्यामुळे उपोषण सुरूच राहील असे राज्य सहकारी संघ सेवक कृती संघटनेचे सचिव दिनेश सोनालेकर यांनी सांगितले. ते म्हणाले, दसरा, दिवाळी सणासुदीच्या दिवसातही सतरा महिन्यांपासून पगार नाही. कुटुंबाचा उदरनिर्वाह




**जे डी जाधव सहकार्यांना उद्देशून बोलताना**

कसा चालविणार असा प्रश्नव पडला आहे पण तरीही जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत आमचे उपोषण सुरूच राहील.

सुधारित दराप्रमाणे शिक्षणनिधी मिळणे, सतरा महिन्याचा थकीत पगार मिळणे, सन १९९७–१८ पासून बंद झालेले थकीत अनुदान व कायमस्वरूपी अनुदान मिळणे, जीएसटी मधून राज्य सहकारी संघाचे नाव वगळणे, गुजरात राज्य संघाप्रमाणे राज्य संघास दर्जा देणे या प्रमुख मागण्यांसाठी हे उपोषण सुरु असल्याचे या संघटनेचे अध्यक्ष जे. डी. जाधव यांनी सांगितले.



**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके । शरण्ये त्र्यम्बके गौरि नारायणि नमो: स्तुते।।** **वृत्तविद्या प्रतिनिधी**

# कात्रज तलाव घाणीच्या विळख्यात



**कात्रज तलावातील पाण्याला दुर्गंध; कचऱ्यामुळे तलावाचे अस्तित्व धोक्यात**

**वृत्तविद्या प्रतिनिधी**

पुणे दि १५ : कात्रज येथील पेशवेकालीन तलावामध्ये भिलारवाडी, गुजरवाडी तसेच आजूबाजूच्या परिसरातील गटारी, मैलापाणी सोडण्यात येते. त्यामुळे तलावातील पाण्याला दुर्गंधी येत आहे.

नगरपालिकेने हा तलाव सुशोभित करण्यासाठी पाच कोटी रुपये खर्च केला, परंतु तलावात साठलेल्या कचरा, घाणीमुळे हे पैसे आणि सुशोभिकरण पाण्यातच गेले असे म्हणणे काही वावगे ठरणार नाही. एकेकाळी पुण्यातील प्रेक्षणीय स्थळांपैकी एक स्थळ म्हणून गणल्या जाणाऱ्या या तलावात आता कचरा आणि घाणीचे वर्चस्व दिसून येते आहे. विशेष बाब म्हणजे या तलावाकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासह महापालिका प्रशासनाचे हि दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. तलावाच्या काठी थर्माकोल, प्लास्टिक, पाण्याच्या तसेच मद्याच्या बाटल्या तरंगताना दिसून येतात. या तलावाशेजारी निर्माल्य टाकण्यासाठी जागा केली आहे, तरीसुद्धा नागरिक पाण्यातच निर्माल्य विसर्जित करतात. तलावाच्या परिसरात वायफाय सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. वाचण्यासाठी वृतपत्र ठेवण्यात आलेले आहेत. लहान मुलांसाठी मनोरंजनासाठी वेगवेगळ्या गोष्टी उपलब्ध करून दिल्या आहेत. प्रेमी युगलांची तर हक्काची जागा आहे. या सर्व गोष्टींमुळे तलावाजवळ सकाळी, सायंकाळी मोठ्या प्रमाणावर गर्दी दिसून येत, परंतु पाण्याच्या येणाऱ्या दुर्गंधीमुळे याठिकाणची गर्दी मोठ्या प्रमाणावर कमी झालेली दिसून येते.

# बापूंच्या स्वप्नातील भारतापासून आपण भरकटतोय : तुषार गांधी

**वृत्तविद्या प्रतिनिधी**

पुणे, दि.१५ : देशासाठी काहीतरी करण्यासाठी आज आपल्या कोणाकडेच वेळ नाही आणि हीच आपली लाचारी आहे. आपण थोडासुद्धा वेळ देशासाठी देऊ शकत नाही, अशी खंत लेखक तसेच मानवी हक्क चळवळीचे कार्यकर्ते तुषार गांधी यांनी आज व्यक्त केली.

सकाळ साप्ताहिकाच्या बत्तिसाव्या वर्धापनदिनानिमित्त टिळक स्मारक मंदिर येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. महात्मा गांधी यांच्या दीडशेव्या जयंती वर्षाला नुकताच प्रारंभ झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर महात्मा गांधी आणि सध्याची सामाजिक–राजकीय परिस्थिती या विषयावर गांधी यांनी आपले मत मांडले. तुषार गांधी हे महात्मा गांधीजींचे पणतू आहेत. सध्याची सामाजिक – राजकीय परिस्थिती सांगताना त्यांनी अनेक मुद्द्यांना हात घातला. लोकशाहीच्या कोणत्याच मूल्याला आपल्या शिक्षणव्यवस्थेत स्थान नाही, अशा शब्दांत त्यांनी शिक्षणव्यवस्थेवर टीका केली.

आजच्या राष्ट्रात व्यक्तीच्या विचारांवर चालण्यापेक्षा त्यांच्या मूर्तींची उंची जास्त महत्वाची वाटू लागली आहे, असेही ते म्हणाले. तसेच आपण आजही सत्तर वर्षांपूर्वी झालेल्या विभाजनाबद्दल दु:ख व्यक्त करत आहोत पण या सत्तर वर्षात आपल्यात जात, धर्म, लिंग, भाषा, प्रांत, यावरून झालेल्या विभाजनाचे काय? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

मेक इन इंडिया आणि मेड इन इंडिया यामध्ये फरक आहे. इस्ट इंडिया कंपनी हीसुद्धा मेक इन इंडियासाठीच भारतात आली होती, असे सांगत त्यांनी सरकारच्या योजनांवर टीका केली तसेच त्यातले दोषही अधोरेखित केले. सामाजिक – राजकीय परिस्थिती जर सुधारायची असेल तर प्रत्येकाने ती आपली जबाबदारी मानायला हवी. राष्ट्र हे नागरिकांच्या एकतेचे प्रतिक असते. आपण स्वतंत्र आहोत ही आपली जबाबदारी आहे, अशा शब्दात त्यांनी व्याख्यानाची सांगता केली.

याप्रसंगी ‘सकाळ’ चे अध्यक्ष प्रतापराव पवार, मुख्य संपादक श्रीराम पवार, राहुल गडपाले उपस्थित होते.

# केडगावचा ‘बजरंगी भाईजान’

**–वृत्तविद्या प्रतिनिधी**

केडगाव, जि. पुणे दि. १६ – अंबरनाथ– ठाणे परिसरातून बेपत्ता झालेला अकरा वर्षांच्या विद्यार्थ्याला दौंड तालुक्याहतील देऊळगावगाडा येथील चिमाजी टुले यांच्या रूपात ङ्कबजंरगी भाईजानङ्क मिळाला. त्यांनी त्याचा सांभाळ केला. अखेर यवतचे पोलिस उपनिरीक्षक राहुल यादव व देऊळगावगाडाचे माजी सरपंच डी. डी. बारवकर यांनी त्याच्या आईवडिलांशी भेट घडवून आणली.

अमित शफीक सय्यद (रा. हाजीमलंगवाडी, ता. अंबरनाथ, जि. ठाणे) हा १५ ऑगस्ट रोजी, ङ्कशाळेत जातोङ्क असे म्हणून गेला. मात्र, तो परत आला नाही. पालकांनी त्याचा खूप शोध घेतला, पण तो सापडला नाही. त्यामुळे शफीक सय्यद यांनी पोलिसांत तक्रार दिली; पण त्याचाही काही उपयोग झाला नाही. हा मुलगा फिरतफिरत देऊळगावगाडा (ता. दौंड) येथे आला. तेथे चिमाजी टुले यांच्या निदर्शनास तो आला. त्यांनी त्याची विचारपूस करत त्याला घरी नेले आणि अंघोळ घालून कपडे, जेवण दिले. काही दिवस त्याचा घरात सांभाळ केला. त्यांनी त्याच्याकडे विचारपूस करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो काहीच बोलत नव्हता. त्यांनी हा प्रकार बारवकर यांना सांगितला.

बारवकर यांनी याबाबत यवत पोलिसांना माहिती दिली.

... पान ०३ वर

# ताणतणाव ऐकणारे अवलिया

**–वृत्तविद्या प्रतिनिधी**

आजच्या या धकाधकीच्या जीवनात माणसाचे जीवन हे अत्यंत प्रवाही बनले आहे. प्रचंड मेहनत करूनही माणसाला समाधान मिळत नाही. नोकरी, नातेसंबंध, गृहकलह या सर्वांना तो योग्य न्याय देऊ शकत नसल्यामुळे निराशेच्या प्रचंड चक्रात सापडतो. योग्य वेळी बोलायला न मिळाल्यामुळे साहजिकच त्याचा एकटेपणा वाढतो. या एकटे पणाला कंटाळून तो आत्महत्येचा मार्ग निवडतो. अशा प्रसंगाला समोर गेलेल्या परंतु स्वतःला सावरून इतरांना अश्याच परिस्थितीतून बाहेर काढणाऱ्या तिघांची हे कहाणी. मीही अशाच प्रसंगातून गेलो, तेव्हा माझ्या सोबत कोणीही बोलायला नसल्यामुळेच मी प्रचंड ताणतणावात राहत असे. लोक आपल्याला काय म्हणतील या विचारात मी नेहमी असे. मला कोणाशी तरी बोलायचे होते पण कोणाशी बोलणार ? कोणी ऐकून घ्यायलाच तयार नव्हते. शेवटी ठरवले बोलण्याच काम बाकीचे करतातच आपण नुसतं ऐकून घ्यायचं जे अशा परिस्थितीत आहेत. असे मत अक्षय ने व्यक्त केले. अक्षय ने त्याला सुचलेली ही कल्पना धनश्री पाटील हिला बोलून दाखवली. तिलाही ही कल्पना प्रचंड आवडली. आणि या कल्पनेतून ऐकून घेण्याचा उपक्रम सुरु झाला. दरम्यान त्यांचाच मित्र नितीन जाधव हा ही या उपक्रमात उत्साहाने सामील झाला. सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांनी हा उपक्रम लोकांपर्यंत पोहचवण्याची सुरुवात केली. परिणामी थोड्याच अवधीत अनेक जणांनी आपले मन या तिघांसमोर मोकळे केले. आता पर्यंत ४८ लोकांनी या उपक्रमाच्या माध्यमातून या तिघांशी संपर्क साधला आहे.

**अनामिकत्व** :

या उपक्रमात निनावीपणा जपण्यात आला आहे. म्हणजेच बोलणाऱ्या व्यक्तीस कोणत्याही प्रकारे आपली ओळख उघड करण्याची गरज नाही. आता पर्यंत आलेल्या सर्व कॉल्स पैंकी जवळपास निम्म्याहून अधिक कॉल्स हे तरुण वर्गापैकी हो- ते. नाते संबंध, गृहकलह अशा तणावांचा यात समावेश होता.

**सल्ला न देणे :**

या सगळ्या उपक्रमातील सर्वात वैशिष्ट्याची बाब म्हणजे तिघेही आलेल्या व्यक्तीला स्वतःचा सल्ला देत नाहीत.



**अक्षय चव्हाण**

फक्त कोणी विचारलेच तर त्या परिस्थितीत त्यांनी काय केला असत अशा स्वरूपाच मार्गदर्शन केले जाते.

मानसिक तणाव हा दिवसेंदिवस वाढत चाललेला एक गंभीर स्वरूपाचा आजार आहे. फक्त बोलायला कोणी नसल्यामुळे लोक टोकाची पावले उचलतात. परंतु या तिघांनी उचलेले हे पाऊल नक्कीच आश्वासक स्वरूपाचे आहे.